# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

सकाळ

# सौरंग्या मंदिर परिसरात स्वच्छता

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम

**चास, ता. १२ : पाडळी-काळेचीवाडी (ता. खेड) येथील डोंगरावर वसलेल्या असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सौरंग्या मंदिर परिसराची हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून मंदिर व परिसर पुन्हा सुशोभित केला. त्यांच्या या कार्यात जिल्हा परिषद सदस्य बाबाजी काळे यांनीही प्रत्यक्ष सहभाग घेतला.**



पाडळी-काळेचीवाडी (ता. खेड) : मंदिर परिसराची स्वच्छता करणारे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी.

खेड व आंबेगाव तालुक्याच्या सीमेवर खेड तालुक्यात असलेले डोंगरावर वसलेले महानुभाव पंथाचे श्री दत्तात्रयांचे सुंदर मंदिर व या मंदिरातील आकर्षक दत्तात्रयांची मूर्ती म्हणजे असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान आहे. नुकत्याच झालेल्या श्री दत्त जयंतीनिमित्त येथे सुमारे दीड लाख भाविकांनी उपस्थित राहून दत्त जयंतीचा सोहळा साजरा केला होता. या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर व परिसरात नारळाच्या शेंड्या, कागद, प्लॅस्टिकच्या पिशव्या यांसह अन्य कचरा मोठ्या प्रमाणावर मंदिर परिसरासह डोंगरावर विखुरला गेला होता. राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत ३५ स्वयंसेवकांनी या डोंगरावर जाऊन मंदिर परिसरातील कचरा गोळा केला. या शिवाय प्लॅस्टिकमुक्त अभियानाचा भाग म्हणून स्वयंसेवकांनी तयार केलेल्या कापडी पिशव्या भाविकांना वाटण्यात आल्या व स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी जागर स्वच्छतेचा हे पथनाट्य स्वयंसेवकांनी मंदिराच्या प्रांगणात सादर करून भाविकांना स्वच्छतेची शपथ दिली. पुरुषोत्तम महानुभव, संपत बालघरे, कार्यक्रम अधिकारी मच्छिंद्र मुळूक, स्वयंसेवक धनंजय वाटेकर, संकेत तांबे, अजय काशीद, विजय काशीद, ऋषीकेश घनवट, अंकिता जगताप, मयूरी कोहिनकर, वृषाली ढमाले, निकिता तनपुरे, कुणाल नाईकडे, यांसह परिसरातील ग्रामस्थ या कार्यात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

Pune, District-Today
13/12/2019 Page No. 5

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख